जा.क्र. ३८०२ सन २०२१.
जिल्हा न्यायालय, सांगली.
दिनांक : ०६/०५/२०२१

प्रति,

१ मा. जिल्हा न्यायाधीश-१ आणि अति सत्र न्यायाधीश, इस्लामपुर.
२ मा. दिवाणी न्यायाधीश व.स्तर सांगली/इस्लामपुर/विटा.
३ मा. मुख्य न्यायदंडाधिकारी सांगली.
४ मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,मिरज/कवठेमहांकाळ/जत/आटपाडी/कडेगाव/पलुस/तासगाव/शिराळा.
५ मा. सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,मिरज/इस्लामपुर/विटा/तासगाव.
६ मा. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इस्लामपुर/विटा.
७ अधिक्षक, रोख व वित्त विभाग/जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, सांगली.
८ सहा.अधिक्षक, रोख व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, सांगली

**विषय :- विशेष जलदगती न्यायालयात काम करणेबाबत.**

संदर्भ :- १. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील पत्र कमांक बी (जन)७५६०१/५७/२०२०/४१९, दिनांक २०/०३/२०२०.
२. मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील अधिसूचना कमांक ए-१२०१/२०२१/७१२ दिनांक ०७/०४/२०२१.

**आदरणीय महोदय/महोदया,**

वरील संदर्भिय विषयास अनुसरुन मला सांगितलेवरुन आपणास कळविणेत येते की, महिला व बालक अंतर्भूत असलेली बलात्कार व पोक्सो कायद्यांतर्गतची प्रलंबित प्रकरणे चालवून त्वरीत निकाली काढण्यासाठी आणखी एका विशेष जलदगती न्यायालयाची स्थापना जिल्हा न्यायालय, सांगली येथे करणेची असलेने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील पत्र व अधिसूचनेनुसार यापुर्वी जिल्हा न्यायालय, सांगलीच्या आस्थापनेवरुन **जे कर्मचारी दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजीनंतर** सेवानिवृत्त झाले आहेत ते विशेष जलदगती न्यायालयात खाली नमूद पदावर काम करणेस इच्छुक असलेस त्यांनी त्यांची लेखी संमती **दिनांक ११/०५/२०२१ रोजी पर्यंत** या कार्यालयास कळविणेची आहे. सदरची संमती प्रत्यक्ष कार्यालयात येवून देता येईल अथवा ईमेल/फॅक्सद्वारे स्वीकारली जाईल.

| अ.क्रं. | पदाचे नाव | पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | लघुलेखक उच्चश्रेणी / लघुलेखक ग्रेड-२ | १ |
| २ | वरिष्ठ लिपीक | १ |
| ३ | कनिष्ठ लिपीक | २ |
| ४ | शिपाई | २ |

**सदरचे पत्र आपले कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन तसा अहवाल या कार्यालयास न चुकता कळविणेचा आहे.**

आदेशावरुन
(पी.एस.व्हटकर)
प्रबंधक
जिल्हा न्यायालय, सांगली.